नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ११ Issue - 11 | वार बुधवार दि. २८ मे २०२५ Blow- Wednesday Date 28 May 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## नुकसानीचे पंचनामे तत्काळ करण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

### अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा मंत्रिमंडळ बैठकीत आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : राज्यातील अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आढावा घेण्यात आला. शेती आणि घरांच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करावेत आणि नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या सुरवातीलाच राज्यातील अतिवृष्टी, धरणातील पाणी साठे, पिक-परिस्थिती याबाबतचा आढावा घेण्यात आला. आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत विविध यंत्रणांच्या सज्जतेचा आढावा घेण्यात आला.

यावेळी झालेल्या चर्चेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री मंत्री गिरीष महाजन, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, क्रीडा व युवक कल्याण दत्तात्रय भरणे, रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी चर्चेत भाग घेतला.

**आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांच्या सज्जतेचा आढावा**

राज्य आपत्कालीन कार्यकेंद्रातून बचाव व मदत कार्यासाठी प्रभावी समन्वयन साधण्यात येत असल्याची माहिती मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

'सचेत' प्रणालीवरून १९ कोटी मोबाईल लघु संदेशाद्वारे पाऊस, वीज सतर्कतेचे संदेश देण्यात येत आहेत. त्यावरून १९ कोटी २२ लाख मोबाईल लघु संदेश पाठविण्यात आले. राज्य आपत्कालीन कार्यकेंद्राला अत्याधुनिक संवाद यंत्रणा व आपत्तींच्या माहितीचे विश्लेषण करणाऱ्या डीएसएसने सुसज्ज करण्यात आले आहे.



राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या नागपूर येथे दोन आणि धुळे येथे दोन अशी चार पथके सज्ज ठेवण्यात आली आहेत. नांदेड येथे तैनात करण्यात येणारी पथके ही धुळे येथून रवाना झाली आहेत. गडचिरोली येथे तैनात करण्यात येणारी पथके ही नागपूर येथून रवाना होत आहेत. यासह राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तुकड्या सज्ज ठेवण्यात आल्याचे श्रीमती सेठी यांनी सांगितले.

राज्यात वीज पडून, भिंत कोसळून, झाड पडून, पाण्यात बुडून आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण जखमी झाले आहेत. या मृतांच्या नातेवाईकांना आवश्यक ती मदत व नियमानुसार आर्थिक मदत तत्काळ पोहचविण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी उजनी धरणाच्या जलाशयातील जलसाठा अकरा टीएमसीने वाढल्याची माहिती दिली. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांनी गेल्या चार दिवसांत झालेल्या पावसामुळे राज्यात टँकरच्या संख्येत काही अंशी घट झाली आहे, तथापि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांत अजूनही टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याची माहिती दिली.

## देशाला वरुणराजा पावणार! यंदा सरासरीपेक्षा अधिक बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशवासियांसाठी दिलासादायक बातमी आहे. हवामानाचा अचूक अंदाज नोंदवण्यासाठी भारताने स्वदेशी भारत अंदाज प्रणाली सुरू केली आहे. याद्वारे हवामानाचे टॅक्रिंग करणे सुरू करण्यात आले आहे. हवामानाचा अंदाज फक्त या नवीन प्रणालीद्वारेच सध्या लावला जात आहे. दरम्यान, हवामान विभागाने सूचित केले की, पुढील जून महिन्यात उष्ण-तेची लाट येणार नाही. पण, कोअर झोन म्हणजेच शेतीप्रधान राज्यांमध्ये मान्सून सरासरी-पेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे.




हवामान विभागाच्या मते, जूनमध्ये देशभरात सरासरीपेक्षा १०८ टक्के अधिक पर्जन्यवृष्टी होणार आहे. गेल्या वर्षीच्या तु-लनेत यावेळी १०५ टक्के अधिक पावसाचा अंदाज होता, परंतु आता असे म्हटले जात आहे की संपूर्ण मान्सून हंगामात (१ जून ते ३० सप्टेंबर) १०६ टक्के अधिक पाऊस पडू शकतो. वृत्तानुसार, मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पात सामान्यापेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर वायव्य भारतात सामान्य पाऊस अपेक्षित आहे. ईशान्य भारताबद्दल बोलायचे झाले तर, येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जून महिन्यात, देशाच्या बहुतेक भागात सामान्य किंवा त्याहून अधिक पाऊस पडणार आहे.

तथापि, ईशान्येकडील द्वीपकल्पातील काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडेल. जूनमध्ये वायव्य भाग वगळता देशाच्या बहुतेक भागात कमाल तापमान सामान्य किंवा त्याहून कमी राहणार आहे. मान-सूनपूर्व हंगामात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे चित्र आहे. जूनमध्ये मात्र देशाच्या बहुतेक भागात किमान तापमान सामान्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, याचा अर्थ रात्री जास्त उकाडा जाणवू शकतो. मान्सूनचा वेग ३ ते ४ दिवस असाच राहण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात एक प्रणाली तयार झाली आहे, कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे, यामुळे पाऊसही दमदार बरसणार आहे.

भारताने हवामानाचा अंदाज घेण्याच्या आपल्या क्षमतेत एक मोठे पाऊल उचलले आहे. सरकारने इंडिया फोरकास्टिंग सिस्टम सुरू केले आहे. हे जगातील (पान २ वर...)

## महाराष्ट्रात ६६ नव्या करोनाबाधितांची वाढ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात आज दिवसभरात ६६ नव्या करोनाबाधितांची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत सर्वाधिक ३१ तर त्यापाठोपाठ पुण्यात १८ करोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात सध्या ३२५ सक्रिय करोनाबाधित रुग्ण आहेत. त्यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत.

महाराष्ट्रात गेल्या २४ तासांमध्ये मुंबई, पुणे पाठोपाठ ठाण्यात ७, पनवेलमध्ये ७ आणि नागपूरात २ नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. महाराष्ट्रात जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत ४३५ करोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. यापैकी एकट्या मुंबईत ३१६ रुग्णांची नोंद झाली आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत हज-ारो रुग्णांच्या चाचणीतून ४३५ रुग्ण करोना पॉझिटिव्ह आढळले असले तरी १०६ रुग्णांनी करोनावर मात केली आहे. त्यामुळे त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे.

राज्यात जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत ४ करोनाबाधित रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. यामध्ये ठाणे आणि कल्याणमधील मृतक रुग्णांचा समावेश आहे.

आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, चार मृतकांपैकी एका (पान २ वर...)

## लाचखोर उपजिल्हाधिकाऱ्याच्या घरी धाड, ५० लाखांचं सोनं, मोठं घबाड जप्त

संभाजीनगर : लाचखोर अधिकाऱ्यांवर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाईचा बडगा उगारला जा असून छत्रपती संभाजीनगरच्या निव-ासी उपजिल्हाधिकाऱ्यांना लाच घेताना एसीबी पथकाने अटक केली आहे. उपजिल्हाधिकाऱ्यांनी शेतजमिनीच्या कामासाठी तब्बल ४१ लाखांची मागणी केली होती. यापूर्वी या प्रकरणात २३ लाख रुपये त्यांची घरीही पोहोचले आहेत. मात्र, आणखी १८ लाख रुपयांची मागणी त्यांनी तक्रारदाराकडे केली होती. अखेर पाण्यासारखं पैसे मागणाऱ्या या लाचखोर अधिकाऱ्याविरुद्ध तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. त्यानंतर, एसीबीच्या अधिकाऱ्यांना सापळा रचून लाचख-ोर विनोद खिरोळकरला अटक केली. त्यानंतर, त्याच्या घराची झाडाझडती घेतली असता मोठं घबाड पोलिसांना सापडलं आहे. त्यामध्ये, तब्बल ५० लाख रुपयांचे सोनं आहे. ५८९ ग्रॅम म्हणजेच ५९ तोळे सोनं एसीबीने जप्त केलं आहे.




लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज दुपारी धाड टाकून लाचखोर अधिकाऱ्याला अटक केली. तक्रारदाराकडे मागणी केलेल्या १८ पैकी ५ लाख रुपये घेताना एसीबीने निवासी उपजिल्हाधिकारी विन-ोद खिरोळकरला रंगेहात ताब्यात घेत-ले. या कारवाईने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. तक्रारदाराला वर्ग २ ची जमीन वर्ग १ करायची होती. आणि याच करिता निव-ासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. त्यांनी संबंधिताकडे सद-रील काम करून देण्यासाठी ४१ लाख रुपये मागितले होते. त्यातील २३ लाख रुपये संबधित तक्रारदाराकडून आधीच घेतले होते. मात्र, तरीही १८ लाखांची पुन्हा मागणी करण्यात आली. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली. अव्वल कारकुन दिलीप त्रिभुवन मार्फत ही लाच घेण्यात येत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यासह, एसीबीने लाचख-ोर खिरोळकरच्या घरी धाड टाकून मोठा ऐवज आणि रोकड जप्त केली आहे.

एसीबीने खिरोळकर यांच्या घरातून तब्बल १३ लाख ०६ हजार ३८० रुपयांची रोकड, ५८९ ग्रॅम म्हणजेच ५९ तोळे सोन्याचे दागिने, ज्याची किंमत अंदाजे ५० लाख ९९ हजार ५८३ रुपये आहे. तसेच, ३ किलो ५५३ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने ज्याची किंमत ३ लाख ३९ हजार ३४५ रुपये एवढी आहे. मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम अशी एकूण ६७ लाख ४५ हजार ३०८ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

### जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस स्टेशन निहाय तसेच तालुका व जिल्हा स्तरावरील अल्पसंख्यांक कल्याण समितीवर जैन संघटनाच्या प्रतिनिधींना स्थान द्यावे - अध्यक्ष ललित गांधी

## जैन समुदायातील नागरिकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- जैन समुदायातील नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्था-पना करण्यात आलेली आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी जैन समुदायातील नागरिकांना त्यांच्यासाठी असलेल्या विविध शासकीय योजना बाबत जागृत करावे व त्यांच्यापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवावा, असे आवाहन जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष(राज्यमंत्री दर्जा) तथा महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी केले.

नियोजन समिती सभागृहात आयोजित जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा आढावा अध्यक्ष ललित गांधी यांनी घेतला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जैन संघटनेचे पदाधिकारी केतन शहा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, जिल्हा नगरपालिका प्रशासन अधिकारी विना पवार, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश नवले, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. बी. काटकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

श्री गांधी पुढे म्हणाले की सर्व शासकीय यंत्रणांनी अल्पसंख्याक समुदायासाठी योजनांचे अंलबजावणी करत असताना जैन समाजा-




तील नागरिकांनाही त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती द्यावी. शालेय शिक्षण, शालेय पोषण आ-हार, वस्तीगृह योजना घरकुल योजना बँकांकडून कर्जावरील व्याज सवलत योजना आदीबाबत समाजाला जागृत करावे व त्यांना त्या योजनेचा लाभ देण्यासाठी शासकीय यंत्रणा यांनी काटेकोरपणे नियोजन करावे असेही त्यांनी सूचित केले.

एकूण जैन समाजापैकी ३० टक्के समाज मागास असून या समाजाला शासकीय योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री आ-वास योजना शहरी अंतर्गत सोलापूर शहरात जैन समाजातील सुमारे दीडशे कुटुंबासाठी एक एकर जागा प्रशास-नाने उपलब्ध करून द्यावी. तसेच जैन समाजातील साधू संत पायी प्रवास करतात त्यांना विश्रामासाठी प्रत्येक शासकीय शाळेमध्ये शासनाच्या वतीने एक सभागृह निर्माण करण्यात येणार आहे, त्याचा लाभ त्यांना द्यावा तसेच इतर वेळी सभागृह शाळेच्या काम काजासाठी वापरण्यास हरकत नाही असेही त्यांनी सांगितले.

सोलापूर महापालिकेने शहरांमध्ये वालचंद हिराचंद यांचे स्मारक व पुतळा उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी त्याप्रमाणेच होटगी रोड येथील सोलापूर विमानतळाला वालचंद हिराचंद यांचे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव पाठवावा अशाही सूचना श्री गांधी यांनी केल्या. त्याप्रमाणेच जिल्हास्तरीय शांतता समिती तसेच तालुका व पोलीस स्टेशन न्याय शांतता समितीमध्ये जैन समाजाच्या प्रतिनिधींना सदस्य म्हणून घ्यावे तसेच सोलापूर शहर व जिल्ह्यातील प्राचीन जैन मंदिरांना तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी असेही त्यांनी सूचित केले.

अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांना ८२९ कोटीचे विविध प्रकल्पासाठी कर्जवाटप बँकांनी केलेले आहे त्यातील ३९० जैन लाभार्थ्यांना ५९ कोटीचे कर्ज वाटप केलेले आहे. परंतु बँकांनी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार या कर्जावरील व्याजदरात अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींना किमान एक टक्के सवलत द्यावी, असे निर्देश दिले-ले आहेत. त्यानुसार जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी माहिती घेऊन संबंधित बँकांना याबाबत सूचित करावे व कर्जावरील व्याज सवल-तीचा लाभ मिळवून द्यावा असेही त्यांनी सूचित केले.

अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी जिल्हा प्रशासनाच्या वतीने अल्पसंख्याक समुदाय व जैन समुदायासाठी असलेल्या योजनांची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी प्रशासनाच्या वतीने करण्यात येत असल्याचे सांगितले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी प्रशासनाच्या वतीने अल्पसंख्याक समुदायासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली तसेच त्या योजनांच्या अनुषंगाने संबंधित विभाग प्रमुखांनी त्यांच्या स्तरावरून करण्यात येत असलेल्या अंमलबजावणीची माहिती बैठकीत दिली.

# महाराष्ट्रातील सहा मान्यवर पद्म पुरस्काराने सन्मानित

## संपादकीय....

### बळीराजा सुखावणार

हवामानाचा अचूक अंदाज नोंदवण्यासाठी भारताने स्वदेशी भारत अंदाज प्रणाली सुरू केली आहे. याद्वारे हवामानाचे टॅक्रिंग करणे सुरू करण्यात आले आहे. हवामानाचा अंदाज फक्त या नवीन प्रणालीद्वारेच सध्या लावला जात आहे. दरम्यान, हवामान विभागाने सूचित केले की, पुढील जून महिन्यात उष्णतेची लाट येणार नाही. पण, कोअर झोन म्हणजेच शेतीप्रधान राज्यांमध्ये मान्सून सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या मते, जूनमध्ये देशभरात सरासरीपेक्षा १०८ टक्के अधिक पर्जन्यवृष्टी होणार आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी १०५ टक्के अधिक पावसाचा अंदाज होता, परंतु आता असे म्हटले जात आहे की संपूर्ण मान्सून हंगामात (१ जून ते ३० सप्टेंबर) १०६ टक्के अधिक पाऊस पडू शकतो. वृत्तानुसार, मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पात सामान्यापेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर वायव्य भारतात सामान्य पाऊस अपेक्षित आहे. ईशान्य भारताबद्दल बोलायचे झाले तर, येथे सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जून महिन्यात, देशाच्या बहुतेक भागात सामान्य किंवा त्याहून अधिक पाऊस पडणार आहे. तथापि, ईशान्येकडील द्वीपकल्पातील काही भागांत सामान्यपेक्षा कमी पाऊस पडेल. जूनमध्ये वायव्य भाग वगळता देशाच्या बहुतेक भागात कमाल तापमान सामान्य किंवा त्याहून कमी राहणार आहे. मान्सूनपूर्व हंगामात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याचे चित्र आहे. जूनमध्ये मात्र देशाच्या बहुतेक भागात किमान तापमान सामान्यापेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, याचा अर्थ रात्री जास्त उकाडा जाणवू शकतो. मान्सूनचा वेग ३ ते ४ दिवस असाच राहण्याची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात एक प्रणाली तयार झाली आहे, कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे, यामुळे पाऊसही दमदार बरसणार आहे.

## देशाला वरुणराजा पावणार! यंदा सरासरीपेक्षा अधिक बरसणार

(पान १ वरून..) एक उत्तम हवामान मॉडेल आहे. ते ६ किलोमीटरच्या ग्रीडवर काम करते. त्याचे ध्येय म्हणजे लहान-मोठ्या हवामान बदलांचा अचूक अंदाज लावणे. ही प्रणाली आपत्तीची जोखीम कमी करणे, शेती, पाणी व्यवस्थापन आणि लोकांच्या सुरक्षिततेसाठी पंचायत पातळीपर्यंत अचूक माहिती प्रदान करेल, यासाठी 'आर्क' नावाचा एक नवीन सुपर कॉम्प्युटर बसवण्यात आला आहे.

## महाराष्ट्रात ६६ नव्या करोनाबाधितांची वाढ

(पान १ वरून..) मृतकाला हायपोकॅल्सिमिक सीजर आणि नेफ्रोटिक सिंड्रोमचा त्रास होता. दुसऱ्या रुग्णाला कर्करोग, तिसऱ्याला स्ट्रोक येत होते आणि चौथ्याला कीटोएसिडोसिस आणि लोअर रेस्पिरेटरी ट्रॅक्ट इन्फेक्शनचा त्रास होता. चारही मृतकांना विविध व्याधी होत्या.

करोनाबाधितांची वाढती संख्या ही केवळ महाराष्ट्रात नाही तर इतर राज्यातही बघायला मिळत आहे. तज्ज्ञांच्या मते, वातावरणबदलामुळे बाधितांच्या संख्येत वाढ होत आहे.

आरोग्य मंत्रालयाकडून मार्गदर्शक सूचना

करोनाबाधित रुग्णांची वाढती संख्या पाहता केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून अनेक राज्यांना मार्गदर्शक तत्व जारी करण्यात आल्याची माहिती आहे. प्रत्येक राज्यात त्या त्या ठिकाणी परिस्थिती पाहता उपाययोजना केल्या जात आहेत.

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणाऱ्या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे.








राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते दुसऱ्या व अंतिम टप्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ .मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक सराफ, अच्युत पालव , अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

डॉ. मनोहर जोशी यांना पद्मभूषण (मरणोत्तर) पुरस्कार प्रदान

राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रात अमूल्य योगदानासाठी 'पद्मभूषण' (मरणोत्तर) पुरस्काराने गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांचे सुपुत्र श्री. उन्मेश जोशी यांनी स्विकारला. डॉ. जोशी यांनी पाच दशकाच्या राजकीय कारकिर्दीत मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक, महापौर, आमदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. सन १९९५ मध्ये ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २००२ ते २००४ या कालखंडात त्यांनी लोकसभा अध्यक्षपद भूषवले. रायगड जिल्ह्यातील नांदवी या गावी जन्मलेल्या जोशी यांनी शिक्षण, शिस्त, आणि कार्यक्षम नेतृत्वाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार प्रदान

: अशोक सराफ :

मराठी चित्रपटसृष्टीतील विनोदी अभिनयाचे सम्राट, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना त्यांच्या कला क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनयातील सहजता, टायमिंग आणि विविध भावछटांचे सशक्त सादरीकरण या बाबींसाठी त्यांना हा सन्मान मिळाला. अशोक सराफ यांचे 'अशी ही बनवाबनवी', 'धुमधडाका', 'बाळाचे बाप ब्रम्हचारी' आणि 'पंढरीची वारी' यासारखे अनेक चित्रपट रसिकांच्या हृदयात कायमचे घर करून आहेत.अशोक सराफ यांच्या अभिनयाचे विशेष कौतुक दिग्गज अभिनेता दिलीप कुमार यांनी देखील केले होते. एका नाटकाच्या प्रयोगादरम्यान दिलीप कुमार यांनी सराफ यांना त्यांच्या अभिनयाच्या टायमिंगसाठी शाबासकी दिली होती. श्री. सराफ यांचा अभिनय जीवनभर अविस्मरणीय ठरला आहे. 'अशी ही बनवाबनवी' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अपार यश मिळवले असून, तो आजही मराठी रसिकांचा आवडता चित्रपट आहे. केवळ मराठीच नव्हे तर हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्येदेखील अशोक सराफ यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे.

: अच्युत पालव :

देवनागरी लिपीच्या कलेला नवसंजीवनी देणारे प्रसिद्ध कॅलिग्राफर अच्युत पालव यांना कला क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या सर्जनशीलतेतून देवनागरी लिपीचे सौंदर्य आणि शिस्तबद्धता प्रभावीपणे समोर येते.अच्युत पालव यांची कला शैली ही पारंपरिकतेचा गाभा राखत आधुनिकतेशी सुसंगत अशी असून, ते अक्षरांना विशिष्ट आकार, संतुलन आणि कलात्मक स्पर्श देतात. त्यांच्या लेखनातून केवळ पठनीयता जपली जात नाही, तर सौंदर्यदृष्ट्याही ते अक्षरांना एक नवे आयाम मिळवून देतात. ते फक्त भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही देवनागरी लिपीचा प्रचार व प्रसार करतात. त्यांनी विविध देशांमध्ये कार्यशाळा, प्रदर्शने आणि सेमिनार्सद्वारे देवनागरी लिपीची कला आणि तिची वैशिष्ट्ये प्रभावीपणे मांडली आहेत. यासोबत, त्यांच्या प्रकाशित पुस्तकांमुळे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यांमुळे नागरी लिपीला एक स्वतंत्र कला म्हणून प्रतिष्ठा लाभली आहे.

: अश्विनी भिडे-देशपांडे :

जयपुर-अतरौली घराण्याच्या ख्याल गायकी परंपरेतील आघाडीच्या गायिका अश्विनी भिडे-देशपांडे यांना शास्त्रीय संगीत क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बालपणापासून संगीताची गोडी असलेल्या अश्विनी यांनी गांधर्व महाविद्यालयातून संगीत विशारद पदवी प्राप्त केली. पं. नारायणराव दातार आणि आई माणिक भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी जयपूर घराण्याची सखोल साधना केली.त्यांच्या गायकीत रागांची सौंदर्यपूर्ण मांडणी, भावाभिव्यक्ती आणि लयकारी यांचे अद्वितीय समन्वय आढळतो. त्यांनी शास्त्रीय गायनाबरोबर ठुमरी, भजन, अभंग यातही निपुणता साधली आहे. एचएमवीसह अनेक नामवंत संगीत कंपन्यांमार्फत त्यांचे अल्बम प्रकाशित झाले आहेत. राष्ट्रीय कालिदास सन्मान(२०१६), संगीत नाटक अकादमी पुरस्कार(२०१५), राष्ट्रीय कुमार गंधर्व सन्मान (२००५) यांसारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले आहे. आजही त्या आपल्या गायन, अध्यापन व कार्यशाळांद्वारे ख्याल गायकीची परंपरा समृद्ध करत आहेत.

: सुभाष शर्मा :

यवतमाळ जिल्ह्यातील प्रगतिशील शेतकरी सुभाष शर्मा यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानासाठी पद्मश्री पुरस्काराने यावेळी सन्मानित करण्यात आले. नैसर्गिक शेतीच्या विविध पद्धतींचा अवलंब करून त्यांनी हजारो शेतकऱ्यांना प्रेरणा आणि मार्गदर्शन देत आहेत. सुभाष शर्मा यांचे वडील खेतूलाल यांच्या १६ एकर शेतीची जबाबदारी त्यांच्या निधनानंतर त्यांच्यावर आली. मात्र, २०११ मध्ये त्यांनी वडिलोपार्जित शेती विकून तिवसा शिवारात त्यांनी १६ एकर जमीन खरेदी केली. नव्या जमिनीवर त्यांनी नैसर्गिक शेतीचे प्रयोग सुरू केले. मातीची सुपीकता राखण्याचे तंत्र, पिकांचे नियोजन आणि पर्यावरणपूरक पद्धती यामुळे त्यांची शेती देशभरातील शेतकऱ्यांसाठी आदर्श ठरली. सततच्या प्रयोगशीलतेने आणि जिद्दीने त्यांनी शेतीत नवदृष्टी निर्माण केली. त्यांचा संघर्ष, नवनिर्मितीचा दृष्टिकोन आणि कृषी क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांना पद्मश्री या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले आहे.

: डॉ. विलास डांगरे :

७० वर्षीय डॉ. विलास डांगरे यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. होमिओपॅथीच्या माध्यमातून त्यांनी गरजूंच्या आरोग्यसेवेत अतुलनीय योगदान दिले आहे. त्यांच्या नाडी परीक्षण कौशल्यामुळे ते एक सुप्रसिद्ध होमिओपॅथी चिकित्सक म्हणून आेळखले जातात. खास करून २०१४ मध्ये नागपूरच्या कस्तूरचंद पार्कमध्ये झालेल्या रॅलीदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या घश्याला त्रास झाला होता, तेव्हा डॉ. डांगरे यांनी केलेल्या उपचारामुळे त्यांना आराम पडला होता. नागपूरमधील त्यांचे क्लिनिक गरजू रुग्णांसाठी आश्रयस्थान ठरले असून त्यांनी आतापर्यंत एक लाखाहून अधिक रुग्णांना उपचार दिले आहेत. १० वर्षापासून ते दिव्यांग-दृष्टीहीन झाले आहेत. तथापि, त्यावरही मात करत ते आपली अमूल्य सेवा रुग्णांना देत आहेत.

यंदाच्या पद्म पुरस्कार वितरणाची प्रक्रिया दोन टप्प्यात झाली. पहिल्या टप्पयात ७१ जणांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले, यामध्ये मध्ये ४ पद्मविभूषण, १० पद्मभूषण आणि ५७ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. आज उर्वरित ६८ पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. त्यामध्ये ३ पद्मविभूषण, ०९ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे यंदाच्या पुरस्कार यादीत एकूण १३९ मान्यवरांची निवड करण्यात आली होती. त्यात ७ पद्मविभूषण, १९ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे.

## महावितरण कर्मचाऱ्यांची पाऊस वाऱ्याशी झुंज देत निफाड तालुक्यात अखंड सेवा देण्याचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /निफाड

निफाड तालुक्यात ग्रामीण व शहरी भागात सोमवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने थैमान घातले असून परिसरात मोठाली झाडे विद्युत वाहक तारां वरती पडले तर काही ठिकाणी मेन लाईनचे पोल वाकले तर काही पडले कंडक्टर तुटले , यामुळे निफाड परिसरात काही काळ अंधाराचे साम्राज्य निर्माण झालेले होते अशा कठीण प्रसंगी जनतेचे सुरक्षिततेच्या दृष्टीने कुठल्याही प्रकारचा हलगर्जीपणा न करता महावितरण कर्मचाऱ्यांनी पाऊस वाऱ्याशी झुंज देत अखंड सेवा देण्याचा प्रयत्न केला ,



**नैसर्गिक आपत्तीमध्ये ऊन वारा पाऊस याची तमा ना बाळगतात महावितरणचे कर्मचारी हे अविरत काम करत असून वीज ग्राहकांना विद्युत पुरवठा सुरळीत करतात काही वेळेस काम करताना आमच्या कर्मचाऱ्यांना अडचणी येतात . वीज वितरण करताना वेळेमध्ये मागेपुढे होऊ शकते कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन वीज ग्राहकांनी आम्हाला ही सहकार्य करणे गरजेचे आहे**

**– योगेश जाधव (निफाड शहर अभियंता)**




रात्री चार वाजेपर्यंत अधिकारी व कर्मचारी वर्ग काम करत होते तर दुसरे दिवशीही त्यांचे काम सुरूच होते, महावितरण कर्मचारी वर्षभर मेंटेनेस ची कामे करतात परंतु मुसळधार पाऊस ,वेगाने होणारा वारा ,विजेचा कडकडाट, अनेक नैसर्गिक आपत्ती पावसाळयात होत असून अशा कठीण प्रसंगातही आपल्या जीवाची परवा न करता रात्री अप रात्री चिखल तुडवत उंचपोलावर चढून तारा दुरुस्त करणे ट्रान्सफॉर्मर तपासणे, गंजलेले साहित्य बदलणे ही कठीण काम पूर्ण करत असून दवाखाने शाळा शेतकऱ्यांचे वीज पंप व नागरिकांना अखंड वीज पुरवठा देण्याची धडपड महावितरणचे कर्मचारी करत आहे,



**वरिष्ठ कार्यालयाच्या सूचनेनुसार महावितरण निफाड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी कॉन्ट्रॅक्टरची माणसे हे कुठल्याही स्वरूपातील आपत्तीसाठी तोंड देण्याकरिता सज्ज आहेत व प्रत्येक वेळी वादळी वाऱ्यामुळे खंडित झालेल्या विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत**

**– निलेश नागरे (कार्यकारी उपअभियंता निफाड)**

## पंढरपुरात मुसळधार पाऊस; चंद्रभागा नदीची पातळी दोन मीटरने वाढली, जुना दगडी फुल पाण्याखाली




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पश्चिम महाराष्ट्रात सध्या जोरदार पाऊस सुरू आहे. दौंड, आणि माळशिरस भागात मुसळधार पावसाने दानादान उडाली निरा व डावा कालवा फुटला.

पश्चिम महाराष्ट्रातील अनेक महामद्धे सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे पंढरपूरमध्ये ही जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे चंद्रभागेचे पाण्याची पातळी दोन मीटरने वाढली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे. चंद्रभागा नदीमध्ये सध्या २६००० क्युसेस इतक्या वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पंढरपूर बंधाऱ्याच्या वरून पाणी वाहू लागले आहे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. सध्या पाऊस पूर्णपणे बंद झाला असला तरी आभाळ भरून आलेले आहे... केव्हाही पुन्हा पावसाला सुरुवात होईल चंद्रभागा नदीची पाण्याची पातळी वाढल्याने सतर्कतेचा त्याचा इशारा देण्यात आला आहे.

## कृषिमंत्री कोकाटे यांनी मा.आ. शिंदे यांच्या निवासस्थानी घेतली भेट



पंढरपूर/प्रतिनिधी

नांगुर्ली तालुका माढा येथे आज महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी करमाळा माढा विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्या फार्म हाऊस भेट दिली. यावेळी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यावेळी मामांनी शेलगाव( वांगी) तालुका करमाळा येथे केळी संशोधन केंद्र होण्याबाबत प्रामुख्याने मागणी करून प्रलंबित अनुदान त्वरित मिळावे, कांदा चाळी ज्यांच्या बांधून पूर्ण आहे त्याचे अनुदान, त्याचबरोबर शेतकरी यंत्रसामुग्री हनुमान वाढवून मिळावे या प्रमुख मागण्या केल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गुरसाळे येथील रेस्क्यू ऑपरेशन, तीन व्यक्तींना जीवनदान

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले व तहसीलदार सचिन लंगुटे यांची प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/सोलापूर : गुरसाळे येथील चार नागरिक भीमा नदीच्या पात्राजवळ असलेल्या महादेव मंदिरात दिनांक २५ मे २०२५ रोजी रात्री दर्शनासाठी गेलेले होते.

पुराच्या पाण्याची पातळी वाढत असणे त्यातील एक व्यक्ती रात्रीच बाहेर पडला परंतु इतर तीन व्यक्ती पैकी साधू यांची तब्येत ठीक नसल्याने त्यांना चालता येत नव्हते त्यामुळे ते रात्री मंदिराच्या बाहेर पडू शकले नाहीत. व सकाळी भीमा नदीला मोठा पूर आल्याने ते मंदिरात अडकले. याची माहिती मंदिरात अडकलेल्या व्यक्तींनी गुरसाळे गावचे सरपंच यांना मोबाईल फोन द्वारे दिली त्यानंतर सरपंच दीपक शेठ शिंदे यांनी तहसीलदार सचिन लंगुटे यांच्याशी संपर्क साधला व या तीन व्यक्तींना तात्काळ रेस्क्यू करण्याची मागणी केली.

त्यानंतर तहसीलदार सचिन लंगुटे यांनी मंडळ अधिकारी मार्फत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्याशी संपर्क साधला व तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्ष व जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांच्या समन्वयातून सकाळी साडेसात नंतर गुरसाळे येथे महादेव मंदिरात



भीमा नदीच्या पुरात अडकलेल्या तीन नागरिक व एका कुत्र्याच्या पिल्लासाठी रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे असलेली अद्यावत बोटीमध्ये स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे चार प्रशिक्षित पोहणारे स्वयंसेवक तसेच स्थानिक पोलीस विभागाचा आपत्ती व्यवस्थापन चे प्रशिक्षण दिलेले पोलीस कर्मचारी अमित गवळी यांना घेऊन श्री ढोले हे गुरसाळे येथील गावात पोहोचले. तहसीलदार सचिन लंगुटे ही गावामध्ये पोहोचले.

त्यानंतर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांनी समन्वयातून संपूर्ण रेस्क्यू ऑपरेशनचे कागदावर डिझाईन तयार केले ते डिझाईन बचाव पथकातील स्वयंसेवक तसेच पोलीस कर्मचारी यांना समजावून सांगण्यात आले त्याप्रमाणे बोट चालकांनी त्या पद्धतीने बोट मंदिर परिसरात घेऊन गेले व स्वयंसेवक व

**विद्यमान सरपंच दीपक शेठ शिंदे यांच्या सतर्कतेमुळे हा अनर्थ टाळला!**

पोलीस कर्मचारी यांनी मंदिरातील एक साधू दोन अन्य व्यक्ती व एक कुत्र्याचे पिल्लू यांचे अत्यंत सुरक्षितपणे रेस्क्यू करून त्यांना पुराच्या पाण्यातून बाहेर काढून सुखरूप जागी आणले.

यावेळी पोराच्या पाण्यात अडकलेले साधू व अन्य दोन व्यक्ती यांनी आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी बजावलेल्या भूमिकेचे कौतुक करून पुरातून बाहेर काढल्याबद्दल समाधान व्यक्त करून आभार मानले. या प्रकारे सोलापूर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्ह्यात आलेल्या कोणत्याही प्रकारच्या आपत्ती व्यवस्थापनाची परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व अद्यावत साहित्य सह व प्रशिक्षित मनुष्यबळासह सज्ज असल्याचे हे द्योतकच आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाधिकारी तथा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांच्या नियंत्रणाखाली माळशिरस तालुक्यातील कुरबावी व पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील रेस्क्यू ऑपरेशन यशस्वीपणे राबवून दहा व्यक्तींना सुखरूप बाहेर काढले.

---

## शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी; अनुदानावर तुर, मुग, उडीद व सोयाबीन बियाणे मिळणार, अर्ज करण्यासाठी २९ मे अंतिम तारीख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव (प्रतिनिधी): राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियान अंतर्गत शेतकऱ्यांना अनुदानावर सुधारित वाणांची बियाणे मिळणार आहेत. यामध्ये तुर, मुग, उडीद आणि सोयाबीन या पिकांचा समावेश असून, शेतकऱ्यांनी २९ मे २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही योजना बियाणे बदलाच्या प्रक्रियेला चालना देऊन शेती उत्पादन वाढविण्यासाठी राबवली जात आहे.

या योजनेतून शेतकऱ्यांना प्रमाणित व संकरीत बियाण्यांचे वाटप 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर करण्यात येणार आहे. महाबीज या अधिकृत बियाणे पुरवठादार संस्थेच्या वितरकांकडून शेतकऱ्यांना ७/१२ उताऱ्याच्या आधारे हे बियाणे वितरित केले जाणार आहे. तुर, मुग, उडीद या पिकांच्या १० वर्षांच्या आतील वाणांना ५० रुपये प्रति किलो अनुदान दिले जाणार असून, १० वर्षांच्या वरील वाणांसाठी २५ रुपये प्रति किलो अनुदान दिले जाईल. या पिकांसाठी शेतकऱ्यांना अर्ज करण्याची गरज नाही. मात्र सोयाबीन बियाण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज आवश्यक आहे. सोयाबीनच्या 'फुले किमया' या ५ वर्षांच्या आतील वाणासाठी १०० टक्के अनुदान दिले जाणार आहे.

महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याची अंतिम तारीख २९ मे असून, ३० मे रोजी निवड झालेल्या शेतकऱ्यांना मोबाईलवर संदेश पाठवण्यात येईल. त्यानंतर ३१ मेपासून निवड झालेल्या शेतकऱ्यांनी आधारकार्ड आणि संदेश घेऊन महाबीज वितरकांकडून बियाणे उचलावे.

याच योजनेत पिक प्रात्यक्षिक योजनाही राबवण्यात येणार आहे. यामध्ये नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी अथवा सहकारी संस्था यांचा समावेश असेल. संबंधित गटाची नोंदणी ३१ मार्च २०२४ पूर्वी झालेली असावी. एका गावातून फक्त एका गटाची निवड होणार असून, निवड प्रक्रियाही प्रथम अर्ज करणाऱ्याला प्राधान्य या तत्त्वावर होईल. गटातील २५ शेतकऱ्यांनाच लाभ देण्यात येणार असून, एका कुटुंबातील फक्त एक सदस्य पात्र असेल. तसेच लाभ मिळवण्यासाठी सीळीींरलज्ञ वर नोंदणी असणे बंधनकारक आहे.

या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ार- हरवलीं.ारहरीरीहींर.र्सीं.ळप या संकेतस्थळावर जाऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

---



## मिरज मधील वाणलेस हॉस्पिटल सुरू करणे हेच आमचे मिशन : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली /प्रतिनिधी : सांगली जिल्ह्यातील मिरज येथील वाणलेस रुग्णालय हे सांगली जिल्ह्यात मिशन रुग्णालय म्हणून प्रसिद्ध आहे.ते रुग्णालय मागील काही वर्षांपासून बंद आहे.त्यामुळे या रुग्णालयातील कामगारांची वेतनाविना उपासमार होत आहे.डॉक्टरांना काम नाही.येथील जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा स्वस्तात देण्यासाठीय वानलेस रुग्णालय सुरू करणे काळाची गरज आहे. वानलेस हॉस्पिटल सुरू करणे हेच आमचे मिशन आहे असा निर्धार रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

मिरज येथील वानलेस रुणालयाला केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी भेट देऊन रुग्णालयाची पाहणी केली तसेच डॉक्टर आणि कामगारांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. वानलेस रुग्णालयाचे नियोजित उद्घाटन धर्मदाय आयुक्तांच्या आदेशामुळे रद्द करण्यात आले असून धर्मदाय आयुक्तांच्या समोर या रुग्णालयाचा विश्वस्त व्यवस्थेतील वाद मिटल्यानंतर वानलेस रुग्णालय लवकरच सुरू करण्यात येईल. रिपब्लिकन पक्षाचे ईशान्य भारत प्रभारी विनोद निकाळजे यांच्या नेतृत्वातील टीम वानलेस रुग्णालय पुन्हा सुरू करण्यासाठी करीत असलेले काम प्रशंसनीय आहे.नॉर्थ ईस्ट हॉस्पिटॅलिटी कंपनी चे व्यवस्थापन वानलेस रुग्णालय पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहे.सांगली जिल्ह्यातील गरीब गरजू जनतेला चांगल्या आरोग्य सुविधा औषधोपचार उपलब्ध करून देण्यासाठी वानलेस रुग्णालय सुरू करणे गरजेचे आहे. वानलेस रुग्णालय सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पुन्हा सुरू करू असा निर्धार ना. रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी विचारमंचावर डीक्कीचे प्रमुख पद्मश्री मिलिंद कांबळे; आसाम मधून आलेले अल्फा संघटनेचे प्रमुख अनुप सेठिया ;जनसुराज्य संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष समीत कदम; रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक गायकवाड; अण्णा वायदंडे; परशुराम वाडेकर; सांगली जिल्हा अध्यक्ष राजेंद्र खरात; संजय कांबळे; उत्तम दादा कांबळे; श्वेतपद्म कांबळे; डॉ विजय मोरे; वानलेस रुग्णालय सुरू करण्याची मोहीम हाती घेतलेले रिपब्लिकन नेते विनोद निकाळजे आणि त्यांच्या पत्नी सौ अरुणा निकाळजे ; हितेश शिंदे; बिशप अँड्रयू राठोड; बिशप आर ए सावळे; डॉ प्रभा कुरेशी; कामगारनेते सतीश वायदंडे; नाना वाघमारे; लाला वाघमारे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

---

## कोठुरे विद्यालयात गुणवंतांचा सत्कार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : मवीप्र संचालित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे एसएससी परीक्षेत यश प्राप्त केलेल्या पहिल्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसोबत सत्कार शालेय व्यवस्थापन समिती यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता. आपल्या प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्यध्यापक सुनील सातपुते यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच आपल्या यशात आपल्या आई-वडिलांचा,गुरुजनांचा देखील मोठ्या प्रमाणात वाटा असतो याची जाणीव सदैव स्मरणात ठेवावी हे आवाहन विद्यार्थ्यांना केले.तसेच भविष्यात विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या विविध संधी याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. यानंतर शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सुयोग गीते यांनी शाळेविषयी असलेल्या आपल्या अनेक आठवणींना उजाळा दिला असून विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड.विजय मोगल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना संयम किती महत्त्वाचा असतो हे विविध उदाहरणांच्या सहाय्याने समजावून सांगितले ..कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन सदस्य,पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण भडांगे यांनी केले.

---

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा व्हॉट्सप ग्रुपचा ५ वा वर्धापन दिन बुलढाणा जिल्ह्यातील समशेरसिंग पारधी आदिवासी आश्रम शाळा वरदडा येथे उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुपच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त २६ वा सामाजिक उपक्रम दि.२५ मे २०२५ रोजी समशेर सिंग पारधी आदिवासी आश्रम शाळा जिल्हा बुलढाणा येथे साजरा करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मुंबई येथील एकनिष्ठ शिवसैनिकांच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र भर आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात.गरजू नागरिकांना आर्थिक आणि वैद्यकीय मदतीसोबतच होतकरू विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांना शालेय साहित्य तसेच धान्य आदि वस्तू देणगी स्वरूपात देण्यात येते.कोरोना काळात २५ एप्रिल २०२० रोजी सुरु करण्यात आलेल्या आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून अवघ्या महाराष्ट्रभर विविध सामाजिक उपक्रम राबवून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ८०% समाजकारण आणि २०% राजकारण या ब्रिद वाक्याप्रमाणे सामाजिक ऋण फेडण्याचे काम या ग्रुपच्या माध्यमातून केले जात असून संपूर्ण महाराष्ट्रात या ग्रुपचे सदस्य आहेत.त्यांच्या या स्पृहाणीय कामाची खुद्द उद्धव ठाकरे यांनीही मुक्तकंठाणे प्रशंसा केलेली आहे.आम्हाला गर्व हिंदुत्वाचा या व्हॉट्सप ग्रुपचा वरदडा,बुलढाणा येथे झालेला हा २६ वा सामाजिक उपक्रम असून या ग्रुपकडून समशेरसिंग पारधी आदिवासी आश्रम शाळेतील १२० विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी एक वर्षाच्या नेट




पॅकसह ५० इंच एलईडी टीव्ही, ब्लँकेट, धान्य, गृह उपयोगी वस्तू आणि शालेय साहित्य देण्यात आले.शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कर्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे,सिंदखेड तालुका प्रमुख महेंद्र पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते त्याच बरोबर ग्रुपचे संस्थापक, संचालक संतोष पाटील, अध्यक्ष सुरेश वाडकर, उपसेक्रेटरी भालचंद्र उकिर्डे, सल्लागार विलास चव्हाण, उपसेक्रेटरी सौ. वासंती गोताड, उपखजिनदार सोनिया पाटील तसेच ग्रुपचे सदस्य रेणुका पालांडे, संतोषी पवार, गीता कांबळे, छाया गायकवाड, श्रीराम खेलदार, दत्ताराम मोतेकर, संदीप पाटील तसेच बुलढाणा जिल्ह्यातील शिवसैनिक यावेळी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी विद्येची देवी सरस्वती, क्रांतिवीर समशेरसिंग पारधी तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले. तद्नंतर आशिष रहाटे, संतोष पाटील, रेणुका पालांडे आणि रत्नाबाई पवार यांची समायोजित भाषणे झाली.

---

### मनपा पर्यावरण विभागासह प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष

# भिवंडीतील डाइंग सायजिंगमुळे प्रदूषणात वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी शहरातील यंत्रमाग उद्योगास पूरक धाग्यावर कांजी प्रक्रिया करणाऱ्या सायझिंग व कपड्यावर रंग प्रक्रिया करणाऱ्या डाईंग कारखान्यांच्या बॉयलरमध्ये प्रदूषणयुक्त कचरा जाळला जात असल्याने धुरांड्यातून निघणाऱ्या विषारी धुरामुळे शहरातील प्रदूषणात वाढ झाली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.विशेष म्हणजे पर्यावरणाचे नियम पायदळी तुडवत शहरतील प्रदूषणात वाढ करणाऱ्या या डाइंग सायजिंगकडे मनपा पर्यावरण विभागासह प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दुर्लक्ष होत असल्यानेची बाब खासदार बाळ्या मामा यांनी सोमवारी मनपा मुख्यालयात घेतलेल्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांच्या निर्दशनात आणून दिली . मनपा पर्यावरण विभागाचे डाईंगसाइजिंगच्या प्रदूषणाकडे दुर्लक्ष होत असल्याची खंत देखील यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी व्यक्त केली असून



शहरातील उद्योगधंदे व व्यवसाय महत्त्वाचे आहेत मात्र त्याचबरोबर नागरिकांचे आरोग्य ही महत्त्वाचे असून नियमबाह्य प्रदूषण करणाऱ्या डाईंगसाइजिंग कंपन्यांवर कारवाई करण्याचे निर्देश खासदार बाळ्या मामा यांनी यावेळी दिले आहेत.

साइजिंग व डाईंग कंपन्यांमध्ये दगडी कोळसा जाळण्या संबंधीचे आदेश असताना या कारखानदारांकडून कमी किमतीमध्ये मिळणारा प्लास्टिक,रबर,कचरा,कागद रद्दी बॉयलर मध्ये जाळला जात आहे.ज्यामुळे निघणारा विषारी धूर कमी उंचीच्या धुरांड्यातून सोडला जातो.या धुरांड्यांची उंची कमी असल्याने हा विषारी धूर वातावरणात पसरत असताना अनेक इमारतींमध्ये हा धूर काजळी निर्माण करीत आहे.तर घरातील अनेकाना श्र्वसनाचा विकार जडत आहे.या घातक धुरामुळे शहरातील हवेची गुणवत्ता कमालीची घसरली असल्याने खराब झाली आहे.

शहरातील डाइंग सायजिंगद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यात यंत्रणांना अपयश आले आहे.प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी फक्त कागदोपत्री कारवाया करून आपले हित साध्य करीत असतात तर पालिका पर्यावरण विभागाने प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी दिल्या नसल्याची माहिती देखील यावेळी खासदार बाळ्या मामा यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनात आणून दिली. पर्यावरण विभागाची बेजबाबदारी यापुढे खपवून घेणार नाही असा सज्जड दम देखील यावे खासदार बाळ्या मामा यांनी दिला आहे.

---

## उल्हासनगर पोलीस स्टेशनचे २ पोलीस अंमलदार यांचे पोलीस उप निरीक्षक या पदावर पदोन्नती मिळाल्याने अभिनंदन व सत्कार





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे

मा. पोलीस आयुक्त सो., ठाणे शहर यांचेकडील पोलीस पत्रक दिनांक २२/०५/२०२५ रोजीचे पोलीस पत्रकान्वये उल्हासनगर पोलीस स्टेशनचे १) कमालुददीन कासम शेख हे मा. न्यायालय, कल्याण येथे पैरवी अधिकारी म्हणुन काम पाहतात. २) सुनिल दाजी जाधव हे उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे प्रतिबंधक चे काम पाहतात.

दोघांचेही काम अतिशय उत्कृष्ठ असुन त्यांना सहा. पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप निरीक्षक या पदावर पदोन्नती मिळाल्याने दि. २५/०५/२०२५ रोजी उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे पदोन्नतीबाबत अभिनंदन व सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. सदरवेळी वपोनि / विष्णु ताम्हाणे यांनी त्यांना गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देवुन गौरविण्यात आले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सदरवेळी वपोनि / विष्णु ताम्हाणे, पोनि/ गोडसे (गुन्हे ), सपोनि / बिडगर, पोउपनि यादव, पोउपनि/वाळके, पोउपनि/पाटील व अंमलदार उपस्थित होते.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# जादा दराने खत विक्री करणाऱ्या कृषी केंद्रांवर तात्काळ कारवाई करा

## खताच्या दरातील अनधिकृत वाढीवर संताप; कृषी अधिकाऱ्यांना तात्काळ पावले उचलण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा जिल्ह्यातील कृषी केंद्रांवरून ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकऱ्यांची सर्रास लूट सुरू असून, मूळ दरापेक्षा जास्त किमतीने खत विक्री होत असल्याच्या तक्रारींनी जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड नाझेर काझी यांनी संताप व्यक्त करत कृषी विभागाला थेट इशारा दिला आहे.

शेतकऱ्यांनी थेट ॲड काझी यांच्याशी संपर्क साधून, डीएपीसह विविध खतांचे मूळ दर आणि विक्री दर यामध्ये मोठा फरक असल्याचे निदर्शनास आणून दिले. खतांच्या पिशव्यांवर छापील किमतींपेक्षा अधिक रक्कम शेतकऱ्यांकडून वसूल केली जात



असल्याचे प्रकार समोर आले आहेत.

शेतकरी आधीच महागाई, अनियमित पावसाळा आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत आहे. त्यातच जर कृषी केंद्रद्वारे त्यांची लूट होत असेल, तर हे मुळीच खपवून घेतले जाणार नाही, असे ठाम मत व्यक्त करत ॲड काझी यांनी कृषी अधिकाऱ्यांना कारवाईचे स्पष्ट निर्देश दिले.

**शेतकऱ्यांना ऐन पेरणीच्या तोंडावर लुटणाऱ्यांना सोडणार नाही : ॲड. नाझेर काझी यांचा इशारा**



खत विक्रीतील दरफेर हा फसवणुकीचा गुन्हा आहे. संबंधित कृषी केंद्र धारकांवर गुन्हे दाखल करावेत आणि त्यांचे परवाने तत्काळ रद्द करावेत, अशी मागणी त्यांनी केली.या प्रकाराम ुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रशासनाने जर वेळेत लक्ष दिले नाही, तर शेतकरी आणि विरोधक यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, हे स्पष्ट दिसून येत आहे.शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा दिला जाईल आणि त्यांच्या कष्टाच्या पैशांची लूट करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड नाझेर काझी यांनी व्यक्त केला आहे.

**जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून जादा दराने खत विक्री करण्याच्या प्रकाराची माहिती पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्या कडे देण्यात येणार असल्याचे ॲड नाझेर काझी यांनी यावेळी बोलताना सांगितले.**

# इच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने खासदार सुनेत्रा पवार यांचा पंढरपूर येथे सन्मान

पंढरपूर/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्यसभा खासदार सुनेत्रा अजित पवार यांचे केंद्र सरकारच्या महिला सह शक्ती करण विषय संसदीय समितीवर निवड झाल्या निमित्त इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने पंढरपूर येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा इच्छा भगवंताची मित्रपरिवार चे म ार्गदर्शन किसन जाधव यांनी खासदार सुनेत्रा वहिनी यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष वर्षा आणि शिंदे, बारामती राष्ट्रवादी काँग्रेसचे सुरेश पालवे, सोलापूर शहर उपाध्यक्ष उमेश जाधव , गायकवाड, महादेव राठोड ,आनंद गाडेकर आदींची शहर सरचिटणीस संतोष गायकवाड उपस्थित होते यावेळी खासदार सुनेत्रा पवार यांनी श्री विठ्ठल रुक्माई ची मनोभावे दर्शन घेतले.

दरम्यान राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार हे संपूर्ण महाराष्ट्र सह विविध राज्यांचा दौरा करीत आहे ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना शिक्षण आरोग्य आणि आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने प्रेरित करणे या दृष्टीने त्यांचा दौरा महत्वपूर्ण होता मागील वीस वर्षापासून महिला सबलीकरण व महिलांच्या आर्थिक विकासासाठी खासदार सुनेत्रा पवार हे कार्य करीत आहेत.

महिला सशक्तिकरण ही एक महत्त्वाची संसदीय समिती आहे जी महिलांच्या हक्क कल्याण आणि सहशक्तीकरणाशी संबंधित मुद्द्यावर काम करते संसदीय समितीमध्ये खासदार सुनेत्रा पवार यांची निवड झाल्याबद्दल निमित्त इच्छा भगवंताची परिवर्तन इच्छा वतीने त्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या पुढील कार्यास किसन जाधव यांनी शुभेच्छा दिल्या दरम्यान केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या विविध महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजना तळागाळा पण पोचवाव्या अशी सूचना देखील यावेळी खासदार सुनेत्रा पवार यांनी किसान जाधव यांना दिल्या.

## थोडक्यात...

### विवाहितेचा छळ; पतीविरुद्ध गुन्हा दाखल

सोलापूर : विजापूर रोड येथील भगवत हाउसिंग सोसायटी येथे तु माहेरच्या प्रॉपर्टीचा हक्क का सोडला, हिस्सा माग नाही तर तुझ्या भावाला मारून टाकतो अशी धमकी दिल्याची घटना ५ मे २०२१ ते आजपर्यंत सासरी घडली. याप्रकरणी शौर्या सिद्धेश पाटील (वय-२७, रा.भगवत हाऊसिंग सोसायटी, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.त्यांच्या फिर्यादीवरून सिद्धेश संजय पाटील (रा.रुबी नगर,जुळे सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी शौर्या पाटील या सासरी नांदताना संशयित आरोपी सिद्धेश पाटील यांनी फिर्यादीस वारंवार तुझ्या घरच्यांनी लग्नामध्ये मानपान केला नाही. तू माहेरच्या प्रॉपर्टीचा हक्क का सोडला हिस्सा माग नाहीतर तुझ्या भावाला मारून टाकतो अशी धमकी दिली. तसेच दारू पिऊन शारीरिक मानसिक त्रास देऊन छळ करून मारहाण शिवीगाळ करून दमदाटी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# शिवसेनेत प्रवेश घेण्यासाठी प्रशांत साळुंखे यांना मारहाण; चौघांवर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.

कळंब/प्रतिनिधि सुधाकर रणदिवे : शिंदे शिवसेनेत प्रवेश का करत नाहीस असे म्हणत शिवसेना ठाकरे गटाचे शहर संघटक प्रशांत साळुंखे यांना म ारहाण केल्याप्रकरणी चौघांवर धाराशिव येथील आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मारहाणीत प्रशांत साळुंखे जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत संभाजीनगर काकडे प्लॉट येथे ही घटना घडली आहे प्रशांत साळुंखे हे २३ मे रोजी दुपारी घरीऊन स्कुटी वरून तहसील कार्यालयाकडे जात होते, संभाजीनगर काकडे प्लॉट येथे सुदर्शन उर्फ विशाल गाढवे रा. वरुडा, विनोद उर्फ विलास जाधव रा. नारायण कॉलनी धाराशिव व इतर दोन अनोळखी व्यक्तीने साळुंखे यांना अडविले तुला सुधीर अण्णा पाटील यांनी दिलेला निरोप समजलेला नाही का असे म्हणत संदेश जाधव याच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्यात साक्षीदार का झालास,तुला माज आला आहे का,तुला खलास करून टाकू असे म्हणत शिवीगाळ केली तेव्हा साळुंखे यांनी माझ्या मर्जीचा प्रश्न आहे असे म्हणताच विनोद जाधव यांनी साळुंखे यांच्या गच्चीला धरून मारहाण केली सुदर्शन उर्फ विशाल गाढवे याने लोखंडे रॉडने पायावर जबर मारहाण केली तेव्हा साळुंखे खाली कोसळले मारेकऱ्यांनी आणखीन लाथा बूक्क्यानी मारहाण करून गळा दाबण्याचा प्रयत्न केला त्याचवेळी साळुंखे यांनी आरडाओरड केल्यानंतर दत्ता सोकांडे,युवराज राठोड व इतर माणसं मदतीसाठी धावून आले त्यानंतर म ारेकरी पळून जात असताना आता वाचलास यानंतर तुला जिवंत ठेवणार नाही, शिंदे शिवसेना गटात प्रवेश केला तर तुला जगू देऊ अशी पुन्हा धमकी दिली घटनेनंतर दत्ता सोकांडे व इतर जणांनी साळुंखे यांना धाराशिव येथील आनंद नगर पोलीस ठाण्यात नेले तेव्हा उजव्या पायास मार लागल्यामुळे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले उपचार दरम्यान न साळुंखे यांनी दिलेल्या जबाबावरुन चौघाजणावर धाराशिव आनंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# रिपाइं एकतावादीच्या निवडी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादी सोलापूर जिल्हा अध्यक्ष तथा प्रदेशाध्यक्ष रोजगार आघाडी विकीबाबा चौधरी यांच्या नेतृत्वाखाली दहिटणे येथे फुलचंद चव्हाण यांच्या निवासस्थानी बैठक झाली. रिपब्लिकन पार्टी आरपीआय एकतावादी कर्मचारी पेन्शन धारक संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी फुलचंद चव्हाण यांची निवड व दहिटणे मुस्लिम आघाडी विभागीय अध्यक्ष महबूब शेख यांची निवड व कामगार संघटनेच्या विभागीय अध्यक्षपदी राजेंद्र इब्रामपूर यांची निवड या निवडे प्रसंगी आरपीआय एकतावादी शेतकरी संघटना अध्यक्ष लिंबाजी कलगुडगी आरपीआय एकतावादी कामगार सचिव बलभीम म धुरकर आरपीआय एकतावादी मजूर संघटना विभागीय अध्यक्ष बाळू टिंगरे कलाकार संघटना अध्यक्ष मजून नदाफ वाहक चालक संघटनेचे अध्यक्ष दिगंबर सालपे उपाध्यक्ष स्वामी शेतकरी संघटना आरपीआय एकतावादी विभागीय अध्यक्ष सागर पावले व पंचेजी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते



**रमाईच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम**

**सुनील वारे यांचे प्रतिपादन**

# रमाईच्या संघर्षमय पैलूंना बार्टी उजाळा देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुणे /प्रतिनिधी : त्यागमूर्ती माता रमाईचा संघर्ष मोठा असून महापुरुषांच्या यशात त्यांच्या सहचरणीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून माता रमाईच्या जीवनातील संघर्ष त्याग आणि कठीण परिस्थितीतूनही त्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन दिलेली साथ यामुळेच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर घडले.

माता रमाईच्या जीवनातील अनेक संघर्षमय आठवनी आणि त्यांचे विविध पैलू बार्टी रमाई संशोधन प्रकल्पाद्ववारे उलगडणार असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनील वारे यांनी रमाईच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक २७ मे २०२५ रोजी माता रम ाईच्या स्मृतीदिनानिमित्त माता रमाई व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा महासंचालक श्री वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी अभिवादन करताना मा म हासंचालक म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक पातळीवरचे म हान नेते होते.त्यांचे व्यक्तिमत्व हे हिम ालयासारखे उत्तुंग होते.रमाईने आयुष्यभर दुःखाशी संकटाशी संघर्ष केला.

आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत लेखक ज. वि. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी रमाईच्या जीवनातील संघर्षमय आठवणी रमाई संशोधन प्रकल्पाद्ववारे संग्रही करून उलगडणार असुन संशोधन विभागाच्या वतीने रमाई प्रकल्प सुरू असल्याचे सांगून त्यांनी रमाईच्या स्मृतीस अभिवादन केले.

वाडिया महाविद्यालया सम ोरिल महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील रम ाईच्या पूर्णाकृती पुतळ्यास मा म हासंचालक श्री वारे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी अध्यक्ष श्री विठलदादा गायकवाड, माजी उपमहापौर श्रीमती सुनिताताई वाडेकर,मा नगरसेविका लताताई राजगुरू, परशुराम वाडेकर यांच्या हस्ते मा महासंचालक यांना पंचशीलेची शाल व ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी निबंधक श्रीमती इंदिरा अस्वार, विभागप्रमुख श्रीमती स्नेहल भोषले, श्री उमेश सोनवणे, अनिल कांरडे, दादासाहेब गिते, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचलन श्री रामदास लोखंडे यांनी केले. आभार श्रीमती वैशाली खांडेकर यांनी मानले.

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट, जि. सोलापूर.**

म्हाडा कॉलनी जवळ, स्टेशन रोड, अक्कलकोट.

e-mail : itisoakt@yahoo.com websire http://www.dvet.gov.in

Industrial Training Institute

**या संस्थेत प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५ करीता खालील व्यवसायामध्ये ONLINE पध्दतीने प्रवेश सुरु**

**प्रवेश सत्र ऑगस्ट २०२५**

| अ.क्र. | व्यवसाय (ट्रेड) चे नाव | कालावधी | किमान शैक्षणिक पात्रता | उपलब्ध जागा |
|---|---|---|---|---|
| १. | ड्रेसमेकींग | १ वर्ष | SSC पास/नापास | 20 |
| २. | संधाता (वेल्डर) | १ वर्ष | SSC पास/नापास | 40 |
| ३. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | १ वर्ष | SSC पास | 20 |
| ४. | जोडारी (फिटर) | २ वर्ष | SSC पास | 20 |
| ५. | वीजतंत्री (ईलेक्ट्रीशयन) | २ वर्ष | SSC पास | 40 |
| | | | एकुण जागा | 140 |

**✻ वैशिष्टये ✻**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश गुणवत्तेवर व शासकीय नियमा नुसार दिले जातील. | ८. | परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर अखिल भारतीय स्तरावरचे प्रमाणपत्र |
| २. | सुसज्ज प्रशासकीय इमारत व कार्यशाळा. | ९. | अनुभवी व तंत्र निदेशक वर्ग |
| ३. | रोजगार/नोकरीची खात्री देणारे प्रशिक्षण. | १०. | प्रात्यक्षिकावर आधारित प्रशिक्षण |
| ४. | पात्र प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन. दरमहा ५००/- रुपये ८०% उपस्थिती अनिवार्य | ११. | एस.टी पासची सोय |
| ५. | ग्रंथालय सुविधा, सुसज्ज AVTS Room, Computer Lab. | १२. | अद्यायावत वसतीगृह सुविधा |
| ६. | सर्व प्रशिक्षणार्थी शिकाऊ उमेदवारांना कंपनी मधुन अप्रेंटिशीपची संधी | १३. | निसर्ग रम्य वातावरण |
| ७. | तंत्रनिकेतनास ( Diploma) थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश (अटी लागू) | १४. | ८०% उपस्थिती आवश्यक |

**✻ प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे ✻**

| अ.क्र. | प्रवेश तपशिल | प्रवेशासाठी आवश्यक मुळ कागदपत्रे |
|---|---|---|
| १) | अनुसूचित जाती (SC) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| २) | अनुसूचित जमाती (ST) प्रवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र |
| ३) | विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्ग (VJNT-1, NT-2, NT-3) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ४) | इतर मागास प्रवर्ग (OBC) विशेष मागास प्रवर्ग (SBC) | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२६ पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र) |
| ५) | अपंग, तांत्रिक, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, बोस्टर स्कूल | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला, व संबंधीत EWS प्रमाणपत्र |
| ६) | अन्य (OPEN) संवर्ग | दहावी गुणपत्रिका, शाळा/कॉलेज सोडल्याचा दाखला |
| ७) | इतर प्रमाणपत्र | NCC, MCC, जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा प्रमाणपत्र/रहीवाशी दाखला/तीन फोटो/आधार कार्ड, राष्ट्रीयकृत बँक पास बुक झेरॉक्स, |

✻ आपले प्रवेश अर्ज विहीत मुदतीत https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळा वरुन ऑनलाईन सादर करावे.

✻ प्रवेश माहिती पुस्तिका ही https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

✻ प्रवेश प्रक्रिया ही प्रवेश नियमावलीतील भाग १ व भाग २ दोन नुसार होईल. प्रवेश प्रक्रिया शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी चालू राहील.

✻

**✻ महत्वाची सुचना ✻**

१) ऑनलाईन प्रवेश भरल्यानंतर उमेदवारांना मिळालेला युजर आयडी व पासवर्ड जतन व नोंद करुन ठेवावा. पुढील प्रवेश प्रक्रियेच्या सर्व टप्पयावर अंतिम प्रमाणपत्र मिळेपर्यंत तो आवश्यक आहे.
२) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर विहीत शुल्क भरावे.
३) अर्ज निश्चितीसाठी (Confirmation) जवळच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस भेट द्यावी. अर्ज निश्चित झाल्या शिवाय विकल्प (Option) दिसणार नाही.
४) अर्ज निश्चितीची पावती व निश्चित केलेल्या अर्जाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व प्रवेश फेरीच्या वेळी संस्थेत सादर करावी.
५) अर्ज निश्चिती करताना भरलेल्या अर्जाची एक प्रत व सर्व आवश्यक कागदपत्राची झेराक्स प्रत जोडावी. तसेच आवश्यक तेवढ्या प्रती काढून स्वतः जवळ ठेवाव्यात.
६) उमेदवाराने आपला अर्ज भरताना स्वःताचा किंवा आपल्या कुंटुबातील सदस्याचा चालू असलेला मोबाईल क्रमांक व आपला ई-मेल आयडी बिनचूक पणे नोंदवावा. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दिलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी, बदलू नये. नोंदविलेला मोबाईल क्रमांक आपल्या आधार कार्डशी व बँक खात्याशी जोडलेला असणे आवश्यक आहे. त्या शिवाय SID पोर्टलवर आपला PRN जनरेट होणार नाही.
७) निश्चित झालेल्या अर्जाची (Confirmed Application) प्रत व शुल्क भरल्याची पावती जपून ठेवावी.
८) प्रशिक्षणार्थ्याने प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास पुर्ण प्रशिक्षण शुल्क वसुल करण्यात येईल.
९) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे व तीन झेरॉक्स सेट सोबत आणावे.
१०) प्रवेश निश्चित झाले नंतर जमा केलेले प्रशिक्षण शुल्क व अनामत रक्कम परत मिळणार नाही.
११) ऑनलाइन स्वरुपात शुल्क स्वीकारले जाणार नाही.

**✻ प्रवेशित उमेदवारांना खालील प्रमाणे शुल्क रोखीने भरावे लागेल. ✻**

| अ.क्र. | व्यवसायाचे नाव | कालावधी | खुल्या गटा करीता वार्षिक शुल्क रुपये (Open) | (Open) Total Rs. | मागासवर्गीया करीता वार्षीक शुल्क रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीजतंत्री (इलेक्ट्रीशयन) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2000+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3250/- | 02 वर्षे 1250/- |
| 2. | जोडारी (फिटर) | 02 वर्षे | 2 वर्षे प्रशिक्षण शुल्क 2400+600 अनामत + 50 ओळखपत्र +200 ग्रंथालय +200 सांस्कृतिक कार्य +200 इंटरनेट | 02 वर्षे 3650/- | 02 वर्षे 1250/- |
| 3. | वेल्डर (संधाता) | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1200+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 2150/- | 01 वर्षे 950/- |
| 4. | पंप ऑपरेटर कम मेकॅनिक | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 1000+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1950/- | 01 वर्षे 950/- |
| 5. | ड्रेसमेकींग | 01 वर्षे | 1 वर्षे प्रशिक्षण शुल्क 800+600 अनामत +50 ओळखपत्र +100 ग्रंथालय +100 सांस्कृतिक कार्य +100 इंटरनेट | 01 वर्षे 1750/- | 01 वर्षे 950/- |
| 6. | वसतिगृह | | अनामत 1000/वार्षिक शुल्क 1200 | 2200/- | 2200/- |

टीप :
प्रवेशाच्या सविस्तर माहिती साठी संस्थेत प्रत्येक्ष संपर्क साधावा.

प्राचार्य
औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अक्कलकोट
जिल्हा सोलापूर.